# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे - ४०१ १०१ दुरध्वनी क्र.२८१८११८२, २८१९२८२८.


जा.क्र.मनपा/कर/ ३९३ /२०-२१

दि.१५ /०३/२०२१

वाचा :- जा.क्र.मनपा/कर/३५४/२०-२१ दि. २२/०२/२०२१ रोजीचा आदेश.

संगणक विभाग
आवक क्र: ९८०९
दिनांक : १५/०३/२०२१

## ।। आदेश ।।

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार शहरातील इमारत व जमीन वर महानगरपालिका कर आकारणी करुन मालमत्ता कर वसूल करीत आहे. सद्यस्थितीत थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ५१ अन्वये आयुक्तास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार "अभय योजना २०२१" दि. २५/०२/२०२१ ते दि. १५/०३/२०२१ लागू करण्यात आलेला आहे. सदर अभय योजनेस दि. ३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून त्याचा सुधारीत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. "अभय योजना २०२१" चा कालावधी :-

"अभय योजना २०२१" चा कालावधी हा दि. २५/०२/२०२१ ते दि. ३१/०३/२०२१ असा राहील.

२. योजनेची व्याप्ती :-

- "अभय योजना २०२१" अंतर्गत मालमत्ता कराची दि. २५/०२/२०२१ रोजी थकबाकी असणाऱ्या सर्व करदात्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.
- "अभय योजना २०२१" करीता नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारी शास्ती (दंड/व्याज) माफीचा तपशील खालीलप्रमाणे असेल,

नियम ४१ खालील शास्ती (दंड/व्याज) माफीचा तपशील.

| अ. क्र. | कालावधी | जमा करावयाच्या रक्कमेचा तपशील | नियम ४१ प्रमाणे आकारण्यात येणारी शास्ती (दंड/व्याज) माफीचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २५/०२/२०२१ ते ३१/०३/२०२१ | करदात्यांकडे प्रलंबित असलेली मालमत्ता कराची रक्कम + २५% शास्ती (व्याज) रक्कमेचा एक रक्कमी भरणा केल्यास | ७५% |

३. योजनेचे लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय असतील :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम मधील नियम ४१ अन्वये आकारण्यात आलेली शास्ती (व्याज) रक्कम.

४. अभय योजने अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कम :-

- सदर योजना मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व थकीत मालमत्ताधारकांसाठी लागू राहील
- सदर योजना ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या मालमत्ता कराचा भरणा केलेल्या रक्कमांनाच लागू राहील.
- या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

५. अभय योजने नूसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इ. अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी :-

- ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा. न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे.

- जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा. न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली तर अभय योजनेनुसार संबधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.
- दि. २५/०२/२०२१ ते दि. ३१/०३/२०२१ या कालावधीत मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम + २५% शास्ती (व्याज) रक्कमेचा भरणा केल्यास ७५% शास्ती (व्याज) माफ करण्यात येईल.
- अभय योजनेच्या कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव धनादेश न वठल्यास मालमत्ता धारक या अभय योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही. तथापि, अभय योजनेच्या कालावधीत पुनश्चः दंडासहीत एक रक्कमी रोख रक्कमेचा भरणा केल्यास मालमत्ता धारक हा अभय योजनेचा लाभास पात्र राहील.
- अभय योजनेचा लाभ घेऊन कराचा भरणा केल्यानंतर सदर भरणा रक्कमे संदर्भात कोणत्याही प्राधिकरणापुढे/ न्यायधिकरणापुढे कोणत्याही कारणास्तव दावा दाखल करता येणार नाही.

६. कार्यवाही विषयक बाबी :-

- मालमत्ता कर विभागाने "अभय योजना २०२१" राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कम माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.
- सिस्टीम मॅनेज़र, संगणक विभाग यांनी "अभय योजना २०२१" च्या मुदतवाढी नुसार संगणक प्रणालीत योग्य ते बदल तात्काळ करण्यात यावे.
- ऑनलाईन तसेच My MBMC App व्दारे जे करदाते थकीत रक्कमेचा एक रक्कमी भरणा करतील अशा करदात्यांना या योजनेचा लाभ होण्याच्या दृष्टीने संगणकीय आज्ञावलीत बदल करण्यात यावे.

८. "अभय योजना २०२१" ची जाहिरात व प्रसिद्धी :-

"अभय योजना २०२१" राबविण्यासाठी नागरीकांकडुन मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत ईलेट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्राव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी. याशिवाय महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात यावा.

संबधित सर्व खातेप्रमुखांनी त्यांना दिलेल्या निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीकरीता
१) मा. महापौर सो.
२) मा. उप-महापौर सो.
३) मा. सभागृह नेता
४) मा. सभापती, स्थायी समीती
५) मा. विरोधी पक्षनेता

प्रत :- कार्यवाहीकरीता
१) अति. आयुक्त
२) मुख्य लेखापरिक्षक
३) मुख्य लेखाधिकारी
४) उप-आयुक्त (कर)
५) सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, प्र.क्र. १ ते ६
६) सिस्टीम मॅनेजर
७) प्र. जन संपर्क अधिकारी